दै. सकाळ दि. 05/08/2024

# साठ हजारासह आरोपीस बेड्या

## बिलोलीत डिक्कीतून पळविली होती रक्कम



**बिलोली** : साठ हजारांच्या रोख रकमेसह बिलोली पोलिसांनी ताब्यात घेतलेला आरोपी.

**बिलोली, ता. ४ (बातमीदार):** मोटारसायकलच्या डिक्कीतील साठ हजार रुपये लंपास करणाऱ्या आरोपीस बिलोली पोलिसांनी नवव्या दिवशी रविवारी (ता. ४)ताब्यात घेतले.

शहरातील छोटी गल्ली येथील अब्दुल रशीद चाऊस यांच्या आईचे बचत गटाचे जमा झालेले साठ हजार रुपये २७ जुलै रोजी रात्री साडेनऊ वाजता गाडीच्या डिक्कीतून चोरी करण्यात आले होते. याबाबत बिलोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर पोलिस हेड कॉन्स्टेबल मारुती मुद्देमाल यांच्याकडे तपास सोपविण्यात आला. पोलिसांनी ईदगाहगल्ली बिलोली येथील शेख इमरान शेख सलीम यास संशयित म्हणून ताब्यात घेतले व विचारपूस केली असता त्याने पैसे चोरल्याची कबुली दिली. सदर आरोपीस पोलिसांनी अटक करून त्याच्याकडील साठ हजार रोख रुपये हस्तगत केले. याप्रकरणी बिलोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक अतुल भोसले, सहायक पोलिस निरीक्षक शिंदे, उपनिरीक्षक दिलीप मुंडे यांनी परिश्रम घेणारे मारुती मुद्देमवार व्यंकट घोंगडे यांचे कौतूक केले.

दै. गोदातीर

# बिलोली पोलिसांनी केला चोरीचा गुन्हा उघड; आरोपीस अटक

**नांदेड-** नऊ दिवसांपूर्वी घडलेल्या चोरीचा गुन्हा उघड करून बिलोली पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. तसेच त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरी केलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बिलोली शहरातील अली अब्दुल रशीद चाऊस यांच्या आईने स्कुटीच्या डिकीत ठेवलेले साठ हजार रुपये चोरट्यांनी लंपास केले होते. सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता तेथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी आरोपीचा शोध घेत होते. तपासात संशयीत आरोपी शेख इम्रान शेख सलीम (वय २१ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. इदगाह गल्ली बिलोली) यास अटक करून चोरलेले साठ हजार रूपये जप्त करण्यात आले. सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी हानपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल भोसले, सपोनि शिंदे, पोउपनि दिलीप मुंडे, हवालदार एम. एस. मुद्देमवार, व्यंकट घोंगडे यांनी केली.